**Publication:** Kesari
**Date:** 02/10/2015
**Edition:** Pune
**Page No:** 6
**Headline:** TCS annual quiz contest

# टीसीएसकडून प्रश्नमंजूषा स्पर्धा

**पुणे** : टीसीएस कंपनीच्या पुणेविभागाकडून शालेय विद्यार्थ्यांसाठी भारतातील सर्वात मोठी आंतरशालेय प्रश्नमंजूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. येत्या ६ ऑक्टोबर रोजी ही स्पर्धा यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे होणार आहे. स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेशशुल्क आकारण्यात येणार नाही. आठवी ते बारावीचे विद्यार्थी यामध्ये भाग घेवू शकतात. प्रत्येक शाळा अथवा महाविद्यालय यामध्ये सहभाग घेवू शकते. भारतामध्ये एकूण १५ ठिकाणी ही स्पर्धा घेण्यात येणार आहे. प्रवेशासाठी ३ ऑक्टोबरपूर्वी सुचिता मंत्री यांच्याशी ९२२८८०८३०४ संपर्क साधावा.